श्री हरिहर प्रतिष्ठान संचलित

## गोंविदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातूर

# साहित्यातील नवप्रवाह


मुख्य संपादक

डॉ. सुजाता चव्हाण

प्र. प्राचार्य

संपादक

प्रा. आरेफ शेख

प्रा. विद्यादेवी कांबळे




श्री हरिहर प्रतिष्ठान संचलित

# गोंविदलाल कन्हैयालाल जोशी (रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातुर

# मराठी साहित्यातील नवप्रवाह

मुख्य संपादक

**डॉ. सुजाता चव्हाण**

प्र. प्राचार्य

संपादक

**प्रा. आरेफ शेख**

**प्रा. विद्यादेवी कांबळे**

**विझक्राफ्ट पब्लिकेशन्स् ॲन्ड डिस्ट्रीब्युशन प्रा. लिमिटेड, सोलापूर**

# मराठी साहित्यातील नवप्रवाह

- डॉ. सुजाता चव्हाण, मुख्य संपादक

प्रा. आरेफ शेख, संपादक

प्रा. विद्यादेवी कांबळे, संपादक

- **प्रकाशक:**
  विझक्राफ्ट पब्लिकेशन्स् ॲन्ड डिस्ट्रीब्युशन प्रा. लिमिटेड,
  १२९/४९८, वसंत विहार, मुरारजी पेठ, जुना पुणे नाका, सोलापूर- ४१३००१
  भ्रमणध्वनी - ०९६३७३३५५५१, ०७०२०८२८५५२
  ई-मेल - wizcraftpublication@gmail.com

- **मुद्रक:**
  पालवी प्रिंटर्स,
  १२९/४९८, वसंत विहार, मुरारजी पेठ, जुना पुणे नाका, सोलापूर-४१३००१

- ISBN: ९७८-९३-८६०१३-८२-८

- रुपये: ३००/-

**सर्व हक्क सुरक्षित** (या पुस्तिकेतील प्रकाशित माहिती पूर्व परवानगी शिवाय कुठल्याही माध्यमाव्द्ारे पुर्न प्रकाशित करता येणार नाही.)

या पुस्तकातील प्रकाशित माहिती, मते, विधान, विचार इत्यादी लेखकांचे वैयक्तिक असून लेखकांने व्यक्त केलेली मते, माहिती, विधाने, विचार, इत्यादी बाबत प्रकाशक, मुद्रक आदी सहमत असतीलच असे नाही.

# अनुक्रमणिका


1. साहित्यातील नवे प्रवाह 01
चंद्रकांत पाटील

2. मराठी साहित्यातील नव प्रवाह: काही मुद्दे 11
डॉ. पृथ्वीराज तौर

3. 'काळी आई' तील ग्रामीण जीवन जाणीवा 18
डॉ. भारत हंडिबाग

4. शेतकरी दीर्घकाव्यातील सामाजिक विषमता 25
डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे

5. जागतिकीकरणातील आव्हानात्मक जाणिवा व्यक्त करणारी कल्पना दुधाळ यांची कविता 33
प्रा.डॉ. चंद्रकांत शेरखाने

6. दलित साहित्याचे शक्तीकेंद्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर 40
प्रा. डॉ. अशोक भनुदासराव केंद्रे

7. दलित साहित्यातील जीवन जाणीवा व वास्तवत्ता 44
प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड

8. ग्रामीण साहित्यातील वास्तववादी चित्रण 50
डॉ. रामदिनवार गोविंद शंकरराव

9. ग्रामीण साहित्य प्रवाह कांदबरी 60
डॉ.मच्छिंद्र रामचंद्र गोंटे

10. ग्रामीण साहित्यातील कादंबरीचे स्वरुप 67
प्रा.डॉ.सहदेव विलासराव रसाळ

11. आधुनिक मराठी कवितेतून व्यक्त झालेल्या महानगरीय जाणिवा 75
प्रा. डॉ. संगीता गुंढे

## 10

# ग्रामीण साहित्यातील कादंबरीचे स्वरुप

**प्रा.डॉ.सहदेव विलासराव रसाळ,** सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद

---

ग्रामीण कादंबरीचे मूळ शोधताना आपणस १९ व्या शकतात इंग्रजी शिक्षणाचे प्रभवित झालेल्या पिढीचा विचार करावा लागेल. या काळात महात्मा फुले यांचा 'शेतकऱ्याचा आसूड' हा ग्रंथ ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारा महत्वाचा ग्रंथ ठरतो. त्यांचाच प्रेरणेतून 'बळीबा पाटील' ही कृष्णराव भालेकरांची दुष्काळाची चित्रण करणारी कादंबरी जन्मास आली. धुनर्धारी, र.वा.दिवे, ग.ल.ठोकळ, बी.रघुनाथ, बा.सी.मर्ढेकर, ना.के.महाजन, म.भा.भेसले, वि.ल.बर्वे, न.चिं.केळकर, द.र.कवठेकर, वि.वि.बोकील, वा.ब.कर्णीक, विभावरी शिरुरकर, बा.भ.बोरकर, शांता शेळके इत्यादी ग्रामीण कादंबरीकारांनी स्वातंत्र्यपूर्व काळात कादंबरी लेखन केले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात श्री.ना.पेंडसे, गो.नी.दांडेकर, व्यंकटेश माडगुळकर, के.नारखेडे, दा.गो.बोरसे इत्यादी कादंबरीकारांनी ग्रामीण भागात कोणती स्थित्यंतरे झाली याचा वेध घेतला आहे. १९६० नंतर आलेली ग्रामीण कादंबरी त्याहीपेक्षा प्रभावीपणे मराठी साहित्यात अवतरली. अण्णाभाऊ साठे, उध्दव शेळके, रणजित देसाई, दि.बा.मोकशी, शंकर पाटील, हमीद दलवाई, जयवंत दळवी, चि.त्र्यं.खानोलकर, मधु मंगेश कर्णिक, रा.रं.बोराडे, आनंद यादव, ना.धो.महानोर, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे, श्रीपाद काळे, द.ता.भोसले, लक्ष्मीकांत तांबोळी, आनंद पाटील, पुरूषोत्तम बोरकर, बाबाराव मुसळे, अशोक व्हटकर, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे इत्यादी कादंबरीकारांनी हा कालखंड समृध्द केला. ग्रामीण जीवनामध्ये होत असलेल्या बदलांचे चित्रण या कादंबरीकारांनी केले. ग्रामीण जीवनामध्ये होत असलेला बदल, नवशिक्षितांचे प्रश्न, स्वातंत्र्यानंतर झालेला बदल, ग्रामीण साहित्याची स्वतंत्र ओळख या काळातील कादंबरी वाङ्मयातून झाली आहे.

मराठी ग्रामीण कादंबरी वाङ्मयामध्ये १९९० नंतर तिसरी पिढी जोमाने लेखन करू लागली. या काळातील कादंबरी वाङ्मय मर्यादित असले तरी उत्तम

दर्जाची कादंबरी आकारास आली. यंत्रयुग आणि संगणक युगाचे दर्शन या काळातील कादंबरीने घडवले आहे. ग्रामीण समाज घातचक्रात सापडल्याची कल्पना या काळातील ग्रामीण कादंबरीकारांना पूर्णांशाने आहे. जागतिकीकरण, उदारीकरण, धर्मांधता, जातीयवाद, वंशवाद, दहशतवाद, संस्कार मूल्यांचा ऱ्हास अशा असंख्य प्रश्नांची उकल याच काळातील ग्रामीण कादंबरीने कादंबरी वाङ्‌मयाला नवी दिशा दिली. या काळातील कादंबरीकारांची ओळख तिसऱ्या पिढीतील कादंबरीकार अशी मराठी वाङ्‌मयाच्या प्रांतात झाली.

तिसऱ्या पिढीत म्हणजेच १९९० नंतरच्या काळात ग्रामीण कादंबरी जोमाने लिहिली जात होती. या काळातही आनंद यादवांनी कादंबरी लेखनकेले आहे. त्यांच्या 'नांगरणी', 'घरभिंती' आणि 'काचवेल' ह्या आत्मचरित्रात्मक कादंबऱ्या साहित्याच्या वर्तुळात अवतरल्या. शिक्षण घेत असताना आर्थिक स्थितीशी जुळवून घेणे किती कठीण होते, त्यातच ग्रामीण भागात शेतीमध्ये राबणारे आई-दादा किती मुश्किलीने संसाराचा गाडा हाकत होते. या सर्वांचा पट तिन्ही आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यामधून उलगडत जातो. या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाशी निगडीत असे असंख्य घटनाप्रसंग येतात की, त्यातून ग्रामीण जीवनाचे अस्सल दर्शन घडते. यांच्या साहित्याविषयी डॉ.नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात- "आनंद यादवांच्या 'झोंबी', 'नांगरणी' मध्ये ग्रामीण जीवनातील ससेहोलपट आणि एका नव्या जीवनाला सामोरे जाऊ पाहणारे व्यक्तिमत्त्व प्रकट होताना दिसते."[१] यावरून आनंद यादवांच्या कादंबरी वाङ्‌मयाची कल्पना येण्यास मदत होते.

रा.रं.बोराडे हे सुध्दा जुन्या आणि नव्या अशा दोन्ही पिढीत लेखन करणारे साहित्यिक आहेत. नव्वोदत्तरी काळात त्यांच्या 'चारापाणी', 'इथं होतं एक गाव' या कादंबऱ्यातून त्यांनी ग्रामीण माणसांच्या व्यथा-वेदनांना बोलके करण्याचे काम केले. 'चारापाणी' या कादंबरीतून दुष्काळामुळे हवालदिल झालेल्या ग्रामीण जीवनाचा पट वास्तवाच्या पातळीवरून उलगडून दाखविला. 'इथं होतं एक गाव' ही कादंबरी भूकंपामुळे उद्ध्वस्त झालेल्या माणसांच्या उद्विग्न मनाचे चित्रण करते. प्रस्तूत कलाकृतीतून लातूर आणि किल्लारी परिसरात झालेल्या विध्वंसकारी भूकंपाचे चित्रण कारूण्यपूर्ण भाषेतून आलेले आहे. 'विखुरलेल्या ग्रामीण जीवनाची व ग्रामीण मनाची वाताहत यशस्वीपणे टिपण्याचे काम बोराडे यांच्या कादंबऱ्यांनी केले आहे. कादंबरीतील वास्तव चित्रणावरून त्यांच्या ठिकाणी असलेल्या कादंबरी लेखनाचे सामर्थ्य सहजतेने नजरेत भरते.

महादेव मोरे यांच्या 'झोंबड' आणि 'रानपाखरं' या १९९० नंतर आलेल्या महत्त्वपूर्ण कादंबरीकृती आहेत. पांढरपेशा विश्वाच्या कक्षाबाहेरील माणसांचे चित्रण त्यांच्या कादंबरी वाङ्मयातून येते. शेतमजूर, विडी कामगार, ड्रायव्हर-क्लिनर अशा असंख्य तळागाळातील माणसांच्या जीवनाचे दर्शन त्यांच्या कादंबरी वाङ्मयातून घडते. पांढरपेशा वर्गापेक्षा या माणसांचे जीवन खऱ्या अर्थाने वेगळे आहे. या उपेक्षित जीवनाची इत्यंभूत नोंद म्हणजेच महादेव मोरे यांचे कादंबरी वाङ्मय होय. नव्वदच्या दशकागोदरही त्यांनी महत्त्वाचे कादंबरी लेखन केलेले आहे. त्यामुळे मराठी ग्रामीण कादंबरी वाङ्मयाला त्यांच्या नावाची ओळख आहे. त्यांचे कादंबरी लेखन ग्रामीण साहित्यापासून उपेक्षित असणारे भटके-विमुक्त यांच्या जीवन-जाणिवांचे चित्रण करणारे कादंबरी लेखन आहे.

ग्रामीण कादंबरीतून समस्त ग्रामीण जीवनाचा वेध घेणारे कादंबरीकार म्हणून रंगनाथ पठारे हे नाव ग्रामीण साहित्याला परिचयाचे आहे. त्यांच्या 'दिवे गेलेले दिवस', 'हारण', 'टोकदार सावलीचे वर्तनमान', 'दुःखाचे श्वापद', 'ताम्रपट', 'नामुष्कीचे स्वगत' या उल्लेखनीय कादंबऱ्या होत. त्यांनी ग्रामीण माणसांच्या जीवनामध्ये होत असलेल्या परिवर्तनाची नोंद सूक्ष्मपणे टिपली आहे. ग्रामीण भागात असलेल्या वृत्ती-प्रवृत्तींचा वेध त्यांच्या कादंबरी वाङ्मयाने घेतला आहे. या माणसांच्या जीवनात येत असलेल्या एकाकीपणाचे, हरवत चाललेल्या माणुसकीचे चित्रण येते. जीवन जगत असताना वाट्याला आलेली नामुष्की किती भयानक असते, ती पचवत असताना होणाऱ्या यातना त्यापेक्षही भयानक असतात. या सर्वांची उकल त्यांच्या एकुणच कादंबरी वाङ्मयातून होते.

इ.स.१९९० नंतर उदयास आलेल्या ग्रामीण कादंबरीविषयी मत मांडताना डॉ.वासुदेव मुलाटे म्हणतात- "रंगनाथ पठारे यांचे 'रथ', 'हारण' या कादंबऱ्या, राजन गवस यांच्या 'चौंडकं', 'भंडारभोग' या कादंबऱ्या, बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुध दे', बा.ग.केसकर यांची 'कुणाच्या खांद्यावर' मधुकर वाकोडे यांची 'झेल झपाट', वासुदेव मुलाटे यांची 'विषवृक्षाच्या मुळ्या' ही कादंबरी, 'मध्यरात्र' व 'गांधारीचे डोळे' या नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कादंबऱ्या, गणेश आवटे यांची 'कागूद', विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' व 'पांगिरा' या कादंबऱ्यांमधून ग्रामीण शिक्षित तरूण मनांची घालमेल, कोंडी, दुभंगलेपण तसेच त्याला प्राप्त झालेल्या आत्मभानाचे दर्शन घडते."[१] या काळातील कादंबरीकारांच्या मनामध्ये असलेली आत्मभानाची प्रखर जाणीव निदर्शनास येते. वेगवेगळे प्रश्न या कादंबरीकारांनी असे

हाताळलेले आहेत. याचा प्रत्यय त्यांच्या कादंबऱ्यावरून येतो.

राजन गवस हे या काळातील प्रमुख ग्रामीण कादंबरीकार आहेत. त्यांच्या कादंबरीतून ग्रामीण भागातील वास्तव जिवंतपणे आविष्कृत झालेले आहे. 'कळप', 'तणकट' या कादंबऱ्यांमधून ग्रामीण जीवनातील वृत्तीप्रवृत्तीचे चित्रण त्यांनी सामर्थ्याने केले आहे. ग्रामीण भागात सुशिक्षित वर्गाच्या सुरू असलेल्या हालचाली आणि त्यांच्या सभोवती फिरत असलेल्या ग्रामीण समाज यांचे सचित्र दर्शन वास्तवाच्या पातळीवरून त्यांनी घडविले आहे.

उत्तम बंडू तुपे यांचे नाव या काळातील कादंबरी लेखनामध्ये प्रमुख ग्रामीण कादंबरीमध्ये घेतले जाते. त्यांची 'खुळी' ही कादंबरी ग्रामीण समाजातील अंधश्रध्दाळू वृत्तीवर प्रकाश टाकते. देवदासी आणि भगताभोवती फिरणारा ग्रामीण समाज आणि त्यातून या कादंबरीच्या वाट्याला आलेली मनोरुग्णवस्था हाच या कादंबरीचा केंद्रबिंदू मानावा लागतो. 'झुलवा', 'खाई', 'चिपाड' या त्यांच्या आणखी महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. यातूनही त्यांनी ग्रामीण समाजाच्या विचारसरणीचा वेध घेतला आहे.

विश्वास पाटील यांच्या 'आंबी', 'पांगिरा' आणि 'झाडाझडती' या नव्वदनंतर आलेल्या महत्त्वाच्या कादंबऱ्या आहेत. त्यांच्या कादंबरी वाङ्मयाने ग्रामीण समाजमाणसांच्या भावना बोलक्या केल्या. या माणसांच्या दैनंदिन जीवनात घडत असलेल्या असंख्य प्रश्नांची उकल केली. त्यामुळेच विश्वास पाटील यांचे नाव ग्रामीण कादंबरी वाङ्मयात आवर्जुन घेतले जाते. 'पांगिरा' ही त्यांची उत्कृष्ठ अशी कादंबरी आहे. त्यातून त्यांनी ग्रामीण समाजातील शेती व पाण्याचा प्रश्न वास्तवाधिष्ठितपणे रेखाटला आहे.

या कालखंडातील ग्रामीण साहित्यिकांची पिढी म्हणजे तिसरी पिढी अशी ओळख साहित्याच्या वर्तुळात निर्माण झाली आहे. याविषयी रा.रं.बोराडे म्हणतात- "ग्रामीण साहित्याच्या तिसऱ्या पिढीतल्या लेखकांमध्ये प्रामुख्याने विश्वास पाटील, सदानंद देशमुख, बाबराव मुसळे, राजन गवस, शेषराव मोहिते, भीमराव वाघचौरे, इंद्रजित भालेराव आदी लेखकांचा समावेश होतो."[3] या पिढीतील लेखकांनी विकासाचे गोमटे नाव घेऊन भकास होत असलेल्या खेड्यांचा जीवनपट उलगडून दाखविला आहे.

गणेश आवटे यांनी ग्रामीण समाजातील असंख्य प्रश्न आपल्या ग्रामीण भागातील शिक्षणाचा प्रसार वाढला आणि त्यातच सुशिक्षितांची संख्या वाढल्यामुळे सुशिक्षित बेकारांची संख्या वाढली. त्यातून तरुणाच्या वाट्याला आलेली उद्विग्नता

किती भयानक आहे याचे दर्शन त्यांच्या कादंबरीतून घडते.

ग्रामीण कादंबरी वाङ्मयात नामदेव कांबळे यांची वेगळी ओळख आहे. त्यांनी आपल्या कादंबरीतून उभा केलेला ग्रामीण समाज शेवटच्या वर्गातला आहे. त्यांच्या 'अस्पर्श', 'राघववेळ', 'ऊनसावली', 'मोराचे पाय', 'सांजरंग', 'सेलझाडा' या कादंबऱ्या ग्रामीण समाजजीवनातील वेगवेगळ्या प्रश्नांना भिडतात? ग्रामीण समाजातील दलित जीवनाचे चित्रण त्यांच्या कादंबरीतून आविष्कृत होते. ग्रामीण जीवनातील दलित माणसांचे भावविश्व त्यांनी प्रत्ययकारीपणे टिपले आहे. म्हणूनच नामदेव कांबळे या कालखंडातील इतर कादंबरीकारांपेक्षा वेगळे कादंबरीकार ठरतात.

शेषराव मोहिते यांच्या कादंबरीतून ग्रामीण भागात राहणाऱ्या व शेती करणाऱ्या कुणब्याची कुटुंबगाथा समर्थपणे रेखाटली आहे. 'असं जगणं तोलाचं', 'धुळपेरणी' या त्यांच्या उल्लेखनीय कादंबऱ्या होत. जीवन जगत असताना आलेले भयानक अनुभव, त्यामध्ये ग्रामीण शेतकऱ्यांची होणारी कुतरओढ तरीही तक्रार न करता जीवन जगणारा ग्रामीण समाज हाच शेषराव मोहिते यांच्या कादंबरीचा आत्मा आहे. जीवनातील असंख्य संकटांवर मात करून जगण्याची सचोटी याच कुणब्याजवळ अनुभवातून आलेली आहे. याचे दर्शन या कादंबऱ्यातील पानापानातून घडते.

नागनाथ पाटील 'कोंडणातील जिणं', 'लम्बाडी' या कादंबऱ्यातून ग्रामीण माणसांच्या वाट्याला आलेल्या उद्ध्वस्त जगण्याचे चित्रण समर्थपणे करतात. त्यांची 'कोंडणातलं जिणं' ही कादंबरी विनाअनुदानित महाविद्यालयीन शिक्षणपध्दतीवर प्रकाश टाकते, तर 'लम्बाडी' ही कादंबरी ग्रामीण परिसरातील तांडा संस्कृतीवर प्रकाश टाकते.

इ.स.१९९० नंतरच्या काळामध्ये एक वेगळीच ऊर्जा घेऊन ग्रामीण साहित्यिकांची पिढी लेखन करू लागली. या लेखनातून ग्रामीण जीवन विषयक वेगवेगळ्या जाणिवा आविष्कृत होऊ लागल्या. या पिढीविषयी डॉ.केशव देशमुख लिहितात- "ग्रामीण साहित्यात आज परिणामदर्शी स्वतःचा चेहरा असणारे बरेच लेखक आहेत. त्यात आसाराम लोमटे (इडा पिडा टळो), भारत काळे (ऐसे कुणबी भूपाळ), संजय कृष्णाजी पाटील (लेझीम खेळणारी पोरं), एकनाथ पाटील (खुंट्यावर टांगलेली दुःख), बालाजी इंगळे (झिम पोरी झिम), ऐश्वर्या पाटेकर (भूईशास्त्र), कृष्णात खोत (गावठाण), कैलास दौंड (कापूस काळ), अजय कांडर (आवानओल), तुकाराम धांडे (वळीव), कल्पना दुधाळ (सीझर कर म्हणतेय माती), राजकुमार

तांगडे (आकडा) अशा लेखकांनी समीक्षक आणि वाचकंचे लक्ष वेधून घेतले आहे."[4] यावरून आपणास नव ग्रामीण कादंबरी लेखनातील वेगळेपण सहजपणे जाणवते. या काळातील ग्रामीण लेखकांची पिढी वेगळा विचार घेऊन साहित्याच्या वर्तुळामध्ये अवतरलेली दिसते. त्याचबरोबर माधव कोंडविलकर हे नाव याच काळात ग्रामीण कादंबरी लेखनामध्ये समोर येते. त्यांची 'डाळं' ही ग्रामीण शेतकरी जीवनावरील महत्त्वाची कादंबरी आहे.

सदानंद देशमुख हे या काळातील ग्रामीण वास्तवाला परिणामकारकपणे शब्दबध्द करणारे प्रभावी ग्रामीण कादंबरीकार होते. त्यांची 'तहान' ही ग्रामीण कादंबरी साहित्याच्या वर्तुळामध्ये खूप चर्चिली गेली. तेवढ्याच ताकदीने 'बोरामास' चे लेखन झालेले दिसते. या कादंबरीतून ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकारांचे चित्रण आले आहे. याविषयी डॉ.कृष्णा इंगोले म्हणतात- "शतकाच्या संधिकाळातील संघर्षशील कादंबरीकार म्हणून सदानंद देशमुख यांचा उल्लेख करावा लागेल. 'तहान' 'बारोमास' या त्यांच्या कादंबऱ्या आजच्या वास्तवातील कळीच्या प्रश्नांचा शोध कलात्मक पातळीवर घेण्याचा यशस्वी प्रयत्न करतात."[5] या विवेचनावरून सदानंद देशमुखांच्या ग्रामीण कादंबरीसृष्टीची कल्पना येते.

विजय सिरसट यांची 'काळगर्भ' ही कादंबरी ग्रामीण जीवनाचा आलेख उभा करते. त्याचबरोबर वैजनाथ कळसे यांची 'तीन भिंती' ही महत्त्वाची कादंबरी होय. या कादंबरीतून ग्रामीण समाजात राहूनही जिद्दीने शिक्षण घेतलेल्या प्राध्यापकाची ससेहोलपट उभी केली आहे. याच काळात बा.बा.काटंबे यांची 'काळरात्र' ही कादंबरी प्रकाशित झाली. या कादंबरीतून किल्लारी येथील भूकंपाचे जीवघेणे वास्तव कादंबरीकारांनी रेखाटले आहे. या कादंबरीतून माणसांच्या वाट्याला आलेल्या दुःखाची भयावह वीण कादंबरीकारांनी मोठ्या कारूण्यपूर्ण शैलीतून उभी केली आहे.

बाबू बिरादार यांची 'अंतःपुरूष' ही कादंबरी सत्तांधवृत्तीमुळे अनैतिकतेकडे झुकणाऱ्या वृत्तीचा वेध घेते, तर बाबाराव मुसळे यांची 'वारुळ' ही कादंबरी ग्रामीण भागातील मातंग समाजाचे वास्तव चित्र उभे करते. त्याचबरोबर राजन खान यांच्या 'यतीम', 'जातवान', 'विनशत' या उल्लेखनीय कादंबऱ्या मराठी वाङ्‌मयात प्रविष्ठ झाल्या. त्यांच्या कादंबऱ्यातून मुस्लिम समाजाचे चित्रण आलेले आहे. याच काळात रमेश आंधारे यांची 'पागोरा' प्रकाशित झाली. या कादंबरीतून शेतकरी जीवनाचे चित्रण आले आहे.

प्रतिमा इंगोले यांची ओळख ग्रामीण वाङ्‌मयातील मान्यवर लेखिका म्हणून

केली जाते. त्यांच्या 'बुढाई', 'पार्टटाईम' ह्या कादंबऱ्यातून ग्रामीण भागातील स्त्री जीवनविषयक प्रश्नांवर प्रकाश पडतो. वैदर्भी बोलीच्या प्रभावातून त्यांचे कादंबरी लेखन आकार घेताना दिसते. याच काळात मधु सावंत ह्या स्त्री लेखिका ग्रामीण भागातील जीवनाचा नेमकेपणने वेध आपल्या लेखनातून घेताना दिसतात. 'राहू केतू', 'जिनगानी' ह्या त्यांच्या कादंबऱ्या ग्रामीण जीवनाशी असलेली नाळ अखंडपणे टिकवून ठेवणाऱ्या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या आहेत.

भारत काळे यांनी ग्रामीण भागातील कृषिप्रधान व्यवस्थेचे दर्शन घडविले आहे. 'ऐसे कुणबी भूपाळ' ही कुणब्याच्या जीवनावर प्रकाश टाकते. शेतीमध्ये राबणारी माणसे पण कधी-कधी अविचाराने कशी लयाला जातात याचा ज्वलंत प्रत्यय त्यांची कादंबरी देते. या तिसऱ्या पिढीतील लेखकाविषयी डॉ.किर्ती मुळीक लिहितात- "भारत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ', 'रुपसावली', मोहन पाटील यांच्या 'बस्तान', 'लिगाड', 'खांदेपालट', रामचंद्र पठारे यांची 'पाचर', भास्कर बढे यांची 'पाणकणसं' या प्रमाणे अनेक कादंबरीकारांनी लक्षवेधक लेखन केलेले दिसते."[5] या काळातील ग्रामीण कादंबरी आशयविषयाने कशी संपन्न होत होती, याचा प्रत्यय या कादंबऱ्यातील विविध विषयावरून येतो.

मधुकर वाकोडे यांच्या 'शिलीपशेरा' या कादंबरीतून ग्रामीण भागात राहणाऱ्या झिंगोभोई समाजाचे चित्रण आले आहे. या समाजातील माणसे सातत्याने उदरनिर्वाहासाठी भटकंती करतात. या भटकंतीचे चित्रण उक्त कादंबरीतून येते. त्यांच्यांनतर नारायण सदावर्ते यांची 'कळी अजून फुलली नव्हती', लक्ष्मण गायकवाड यांची 'दुभंग' या कादंबऱ्या ग्रामीण वाङ्मयात अवतल्या. ग्रामीण माणसांचे वेगवेगळे प्रश्न त्यांनी हाताळले. ग्रामीण समाजातील महत्त्वाचे विषय त्यांनी कादंबरीचे विषय केले. या सर्व कलाकृतींवरून आपणास १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीचे बदलते स्वरुप, ज्वलंत प्रश्नांचे रेखाटन, यांत्रिकीकरण व संगणकीकरण या सर्वांचे प्रारूप या काळातील ग्रामीण कादंबरी वाङ्मयातून कळण्यास मदत होते.

१९९० नंतरच्या काळातील ग्रामीण कादंबरीचा चिकित्सकपणे अभ्यास या शोध लेखनातून केला गेला आहे. हा अभ्यास करत असताना काही निष्कर्ष हाती लागले आहेत.

**निष्कर्ष :-**

- इ.स.१९९० नंतर आलेल्या मराठी ग्रामीण कादंबरीच्या माध्यमातून कृषिप्रधान संस्कृतीतून आलेले मूल्यसंस्कार व शहरीकरणामुळे आलेली तथाकथित

आधुनिक मूल्ये आणि द्वंद्व आजच्या ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांच्या मानसिकतेचा एक भाग बनलेली आहेत. याचा सूक्ष्मतेने वेध ही कादंबरी घेते.

- ग्रामीण भागातील दुष्काळ, दारिद्र्य आणि गरिबीत चिरडल्या गेलेल्या माणसांची व्यथा या काळातील ग्रामीण कादंबरीने मुखर केली आहे.
- ग्रामीण तरुणांना राबवून घेऊन स्वतःची सत्ता आणि प्रतिमा अधिक बळकट करू पाहणाऱ्या सरंजामी नेतृत्वाची उकल या काळातील मराठी ग्रामीण कादंबरी करते.
- इ.स.१९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीतून विचाराचे अनेक स्तर आल्यामुळे कादंबरीची मूल्यात्मकता अधिक समृध्द होऊन तिच्या वैचारिकता वाचक मनाला अंतर्मुख करते.
- या काळातील मराठी ग्रामीण कादंबरीने सशक्त गद्याचे नवनवीन भाषिक प्रयोग अगदी सुलभपणे सिध्द केलेले आहेत.
- या काळातील कादंबरीतून शासनाच्या उदासिनतेमुळे ग्रामीण माणसांचे बँका व सावकार सातत्याने कसे शोषण करतात याची स्पष्ट मांडणी झालेली आहे.
- इ.स.१९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीने ग्रामीण माणसे आणि त्यांची मानसिकता, ग्रामीण समाज या समाजातील आचार-विचार, ताण-तणाव, खेड्यातील राजकारण आणि समाजकारण, रीती-रिवाज आणि अर्थकारण या सर्वांचे वास्तवदर्शी स्वरुप उलगडून दाखविले आहे.
- या काळातील ग्रामीण कादंबरीतून व्यामिश्र आशयविश्व, त्याला तोलून धरणारी व्यक्तिचरित्रणे, या व्यक्तीचित्रणांना साकार करणारी भाषा इत्यादींमधून ग्राम संस्कृतीचा पट उपलगडत जातो.

**संदर्भ सूची :**

१. डॉ.नागनाथ कोतापल्ले, साहित्याचा अन्वयार्थ, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती : ऑगस्ट २००८, पृ.क्र.११९

२. डॉ.वासुदेव मुलाटे, ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती : डिसेंबर २००५, पृ.क्र.२४

३. रा.रं.बारोडे, लोकराज्य (वाचन विशेषांक), जून-जुलै : २०११, पृ.क्र.४१

४. डॉ.केशव देशमुख, दै.सामना (संपादकीय), दि.०८ मार्च २०१२, पृ.क्र.०४

५. डॉ.कीर्ती मुळीक, ग्रामीण साहित्याची चळवळ, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती : ०१ जानेवारी २०११, पृ.क्र.२०३